# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 31/03/2021 (बुधवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील नखाते ज्वेलर्स समोर जे. एन. रोड कांद्री कन्हान येथे दिनांक 30/03/2021 चे 19:10 वा. ते 19.15 वा. दरम्यान मृतक नामे– अशोक आशनदास मोटवानी, वय 62 वर्ष, रा. कांद्री, कन्हान हे त्यांचे घरातुन पायदळ निघुन रोड पार करित असतांना एमएच–40/ एन–7566 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपीने त्याचा ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे विरूध्द दिशेने चालवुन मृतकास धडक दिली. या अपघातात अशोक मोटवानी हे गंभीर जखमी होवुन त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रकाश आशनदास मोटवानी, वय 53 वर्ष, रा. पटेल नगर, पिपरी कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेश वरखडे 96377005303 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर